गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे ● अंक १०६ वा ● सोमवार ०२ सप्टेंबर २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 106 | Date : 02/08/2024 | blow Monday | Page 4 Price 4



पोलीस आयुक्त एम. रामकुमार IPS साहेबांच्या सोलापूर येथील निवासस्थानात सदिच्छा भेट देण्यात आले यावेळी  पत्रकार चंद्रशेखर भांगे, दैनिक यश सिध्दी न्युज संपादक कमलाकर सोनकांबळे, बसवराज सोनकांबळे, नीजपा गायकवाड, नितीन हलसंगी, यासह अनेक मान्यवर उपस्थित होते

### ठाकरे-पवारांसह शेकडो कार्यकर्ते रस्त्यावर

## छत्रपती शिवरायांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी

## मविआचं जोडे मारो आंदोलन




**दैनिक यश सिद्धी न्यूज**

मुंबई : सिंधुदुर्गातील राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. या घटनेने महाराष्ट्र हळहळला. २६ ऑगस्टला ही घटना घडली. ज्यानंतर सरकावर आरोपांच्या फैरी झाडण्यात आल्या. आता याच घटनेचा निषेध म्हणून मुंबईत जोडे मारो आंदोलन करण्यात येतं आहे. महाविकास आघाडी या प्रकरणी आक्रमक झाली आहे. तुरुंगात टाकलं तरीही चालेल पण आंदोलन होणारच असा पवित्रा महाविकास आघाडीने घेतला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह तिन्ही पक्षांचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरले आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचा स्वाभिमान त्यांचा अवमान आम्ही खपवून घेणार नाही, असं म्हणत महाविकास आघाडीचे शेकडो कार्यकर्ते रस्त्यावर उतरलं आहेत. यावेळी 'जय भवानी, जय शिवाजी'चा जयघोष केला. 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' असं म्हणत शेकडो कार्यकर्ते गेट वे । **पान २ वर**

### महाविकास आघाडीला निवडणुकीत जनता जोडे मारणार, त्यामुळेच, एकनाथ शिंदेंची टीका

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

मुंबई : मुंबईत महाविकास आघाडीने जोडे मारो आंदोलन करत सरकारविरोधात मोर्चा काढला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा राजकोट या ठिकाणी असलेला पुतळा कोसळला. ज्यानंतर महाविकास आघाडी आक्रमक झाली आहे. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी महाविकास आघाडीला जनता जोडे मारणार आहे असं म्हणत उत्तर



दिलं आहे. निवडणुकीचं घोडामैदान जवळ आलं आहे. महाविकास आघाडीला पराभव दिसू लागला आहे त्यामुळे हे आंदोलन केलं जातं आहे असंही मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी म्हटलं आहे.छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचा स्वाभिमान त्यांचा अवमान आम्ही खपवून घेणार नाही, असं म्हणत महाविकास आघाडीचे शेकडो कार्यकर्ते रस्त्यावर । **पान २ वर**

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू महाराष्ट्र दौऱ्यावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज**


मुंबई : राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू २ ते ४ सप्टेंबर २०२४ या कालावधीत महाराष्ट्राला भेट देणार आहेत. राष्ट्रपती भवन, नवी दिल्ली येथून याबाबत प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.सोमवार २ सप्टेंबर २०२४ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत वारणानगर, कोल्हापूर येथे श्री वारणा महिला सहकारी समुहाच्या सुवर्णमहोत्सवी सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार ३ सप्टेंबर रोजी पुणे येथे सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या (डीम्ड युनिव्हर्सिटी) २१ व्या दीक्षान्त समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.तसेच मुंबई येथे महाराष्ट्र विधान परिषदेच्या शताब्दी वर्षाच्या कार्यक्रमात सहभागी होतील.बुधवार ४ सप्टेंबर रोजी राष्ट्रपतींच्या हस्ते उदगीर, लातूर येथील बुद्ध विहाराचे उद्घाटन होणार आहे. उदगीर येथे महाराष्ट्र शासनाच्या 'शासन आपल्या दारी' आणि 'मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजने'च्या लाभार्थ्यांच्या मेळाव्यालाही त्या मार्गदर्शन करणार आहेत.

### कोयना धरणात यंदा आजवर १४१ अब्ज घनफूट जल आवक

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

कराड : कोयना शिवसागरात यंदाच्या एक जून या जलवर्षाच्या प्रारंभापासून गेल्या तीन महिन्यात १४१.०६ अब्ज घनफूट / टीएमसी (१३४.०२ टक्के) जल आवक, तर कोयना पाणलोटात ५,५१७.६६ घनफूट /क्युसेक वार्षिक सरासरीच्या ११०.३६ टक्के पावसाची नोंद झाली आहे. पावसाचा बराच कालावधी शिल्लक असल्याने सरासरी पाऊस आणखी वाढणार आहे.कोयना पाणलोटक्षेत्रातील पावसाची मुसळधार गेल्या चार- पाच दिवसात अगदीच ओसरल्याने धरणातून कोयना नदीपात्रात होणारा जलविसर्ग पूर्णतः बंद होताना, दुथडी वाहणाऱ्या कोयना, कृष्णा, वारणा आणि पंचगंगा नद्या पात्रातून वाहू लागल्या आहेत.

याखेपेस पावसाळ्याला वेळेत सुरुवात होऊन सलग तीन महिने पावसाची कामगिरी उत्तम राहिली आहे. १०५.२५ अब्ज घनफूट क्षमता असलेल्या कोयना शिवसागराचा जलसाठा आज रविवारी सायंकाळी पाच वाजता १०३.९५ अब्ज घनफूट (९८.७६ टक्के) असून, गतवर्षीच्या तुलनेत तो १७.७३ अब्ज घनफुटाने अधिकचा राहिला आहे. सध्या धरणात प्रतिसेकंद ५,८६१ घनफूट पाण्याची आवक सुरू आहे.



कोयना धरणाच्या १ जून या तांत्रिक वर्षाच्या सुरुवातीपासून यंदा आजवर कोयनेच्या सहा वक्री दरवाजातून आजवर विनावापर ३८.५३ अब्ज घनफूट पाणी (धरण क्षमतेच्या ३६.६० टक्के) कोयना नदीत सोडण्यात आले. तर, पायथा वीजगृहातील वीज निर्मितीसाठी ३.४४ अब्ज घनफूट पाण्याचा वापर झाला आहे.

सिंचनासाठी १,१६ अब्ज घनफूट, तर पश्चिमेकडील वीज निर्मितीसाठी १०.५९ अब्ज घनफूट पाण्याचा वापर झाला आहे. एकूणच कोयनेचा पाणीसाठा, त्यातून वीजनिर्मिती आणि पाणलोटातील पर्जन्यमान समाधानकारक राहिल्याने कृष्णा- कोयना नद्यांकाठची वर्षभराच्या पाण्याची चिंता मिटली आहे.

### जिल्हा सामाजिक कार्य समिती; फॅमिली प्लॅनिंगचे गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर



प्रा. डॉ. दीपक देडे



प्रा. डॉ. निलिमा दामले



प्राचार्य राम ढाले



श्री. इस्माईल शेख



सौ. संगीता शिर्के



सौ. विद्या हराळे-लांबतुरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती आणि फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या गुणवंत शिक्षक पुरस्कारासाठी सहा जणांची निवड करण्यात आली आहे. अशी माहिती गुणवंत शिक्षक निवड समितीचे समन्वयक डॉ श्रीकांत येळेगावकर यांनी दिली.

यंदाच्या वर्षी देण्यात येणाऱ्या पुरस्कारात प्रा. डॉ.दीपक देडे (संतोष भीमराव पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज,मंद्रूप,सोलापूर), प्राचार्य राम ढाले ( एस.व्ही.सी.एस.प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय सोलापूर), प्रा.डॉ.नीलिमा दामले(दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स सोलापूर), प्राचार्य इस्माईल शेख (अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय,सोलापूर), सहशिक्षिका संगीता शिर्के (आदर्श बालक मंदिर, सोलापूर) सहशिक्षिका विद्या हराळे-लांबतुरे (यमाई देवी प्राथमिक आश्रम शाळा,। **पान २ वर**

### भादलवाडी तलाव शेतकरी व मच्छीमारांसाठी वरदान : हर्षवर्धन पाटील

हर्षवर्धन पाटील यांचे हस्ते तलावात मत्स्यबीज सोडले!



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

इंदापूर/ अतुल सोनकांबळे : भादलवाडी तलाव हा खडकवासला कालव्यामधून आपण सर्वांनी प्रयत्नांची पराकाष्टा करून १०० क्षमतेने टक्के भरून घेण्यात आला आहे. गेली १० वर्षांमध्ये या तलावावरील शेतकरी, मच्छिमार यांच्यावर पाण्याअभावी अन्याय होत होता. कर्मयोगी शंकररावजी पाटील भाऊ यांनी दुष्काळामध्ये बांधलेला भादलवाडी तलाव हा शेतकरी, मच्छीमारांसाठी वरदान ठरला आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी रविवारी (दि.१) केले. भादलवाडी (ता. इंदापूर)। **पान २ वर**

### नवोदित शिल्पकारांना छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याची जबादारी देण्याचा निर्णय चुकीचा होता : राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

मालवण : छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याची दुर्घटना अत्यंत दुःखद मनाला चटका लावणारी आहे.या प्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. मालवण राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचे काम नवोदित शिल्पकारास देण्याचा निर्णय चुकीचा होता.राज्यात राम सुतार आणि सारंग सारखे ज्येष्ठ अनुभवी शिल्पकार असताना नवोदितांना ही मोठी जबाबदारी देण्याचा निर्णय चुकीचा होता असे मत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी व्यक्त केले.

आज मालवण मधील राजकोट किल्ल्याला ना रामदास आठवले यांनी आज भेट देऊन छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याची दुर्घटना घडलेल्या जागेची पाहणी केली.मालवण राजकोट मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याची दुर्घटना अक्षम्य आहे.मोठे वादळ आलेले नसताना पुतळा कसा कोसळला याची सखोल चौकशी झाली पाहिजे.नेव्ही आणि पीडबल्यूडी चया जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी झाली पाहिजे. याप्रकरणी दोषींना कठोर शिक्षा झाली पाहिजे.जो कोणी मुख्य दोषी असेल त्यास फशीची कठोर शिक्षा झाली पाहिजे असा हा गुन्हा घडला आहे.असे ना रामदास आठवले म्हणाले.

याप्रकरणी पंतप्रधान मोदींनी माफी मागितली आहे. मुख्यमंत्री शिंदेंनी माफी मागितली आहे. त्यामुळे विरोधकांनी यात राजकारण करू नये. या प्रकरणी चौकशी समिती नियुक्त करण्यात आली आहे. विरोधकांनी यात राजकारण करू नये. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पुन्हा कसा मजबूत चांगला भव्य उभारता येईल यासाठी सर्वांनी एकत्र प्रयत्न करावेत.त्यासाठी राज्य सरकार ने नव्याने पुतळा उभारण्यासाठी सरकारी पक्षासोबत विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधींना आणि तज्ञांचां समावेश करून समिती नियुक्त करावी.या समितीने नवीन पुतळा कसा असावा आणि त्याच्या निर्मिती चे काम कुणास द्यावे याचा शासनाला सल्ला द्यावा.अशी समिती स्थापन करण्याची आपली मागणी असून आपण याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार आहोत असे ना रामदास आठवले म्हणाले.कन्याकुमारी येथे तीन समुद्राचा




संगम आहे तिथे अनेक पुतळे आहेत मात्र आजवर कधीही पुतळा कोसळण्याची दुर्घटना घडली नाही.मात्र राजकोट मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याची दुर्घटना घडली याचे दुःख आहे असे ना. रामदास आठवले म्हणाले.

### धार्मिक कार्याबरोबरच समाजिक कार्य उल्लेखनीय : कमलाकर हट्टेकर

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली



व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेले धार्मिक कार्याबरोबरच समाजिक कार्य उल्लेखनीय असल्याचे मनोगत सलग्न जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमिअभीलेख कमलाकर हट्टेकर, पुणे यांनी व्यक्त केले. ते सहपरिवार श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे सचिव शामराव काका मोरे  यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी ते बोलत होते.त्यांच्या समवेत अक्षय मोरे, उत्तर सोलापूरचे मुख्यालय सहाय्यक सचिन एकबोटे, भूमापक संतोष जाधव, समर्थ होटकर हे उपस्थित होते.

यावेळी न्यासाचे पुरोहित अप्पू पुजारी, सिद्धाराम कल्याणी, प्रवीण घाडगे, आतिश पवार, गोटू माने, मल्लिकार्जुन बिराजदार, शहाजीबापू यादव, पिंटू साठे, बाळासाहेब घाटगे, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, शरद भोसले, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, शिव स्वामी, एस.के. स्वामी, धनंजय निंबाळकर, विशाल घाटगे, तानाजी पाटील, अनिल बिराजदार, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, विठ्ठल रेड्डी यांच्या सह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

### माणसांचे भविष्य ठरविते..

विज्ञानावर असलेल्या लोकांच्या विश्वासाचा गैरफायदा घेत भ्रामक विज्ञान लोकांची फसवणूक करत असते. लोकांच्या आरोग्याशी, भावनांशी खेळतानाच आर्थिक शोषणही केले जाते. म्हणूनच फसव्या विज्ञानाचे हे सोंग ओळखणे आवश्यक आहे. मात्र, यासाठी पारखणे, पडताळणी करणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे गरजेचे आहे. फसवे विज्ञान हे खऱ्या विज्ञानाचे एक सोंग असते. त्याला 'फसवे विज्ञान' वा 'भ्रामक विज्ञान' असेही म्हणता येईल. या भ्रामक विज्ञानाचे एक उदाहरण प्रसिध्द आहे. २००० साली चेन्नई येथील रामन पिल्लई नावाच्या व्यक्तीने आपण शास्त्रज्ञ असल्याचा आव आणून आपल्याला पाण्यापासून डिझेल बनविण्याची एक पध्दत अवगत आहे, असा दावा केला होता. आय. आय.टी. मधील तज्ज्ञांनी केलेल्या चाचणीत त्याची फसवाफसवी उघडकीस आली. पाणी ढवळण्यासाठी पिल्लई जो दांडा वापरत होता तो पोकळ होता. त्यात थोडे डिझेल आधीच भरून घेऊन तो ते अलगद पाण्यात मिसळत असे. पुढे सीबीआयने त्याची चौकशी केली आणि आपण फसवाफसवी करीत असल्याचे त्याने कबूल केले. विज्ञानात गृहीतक, अनुमान, प्रयोग, प्रचिती, पुन्हा पुन्हा पडताळणी आणि प्रचिती अशा पायऱ्या असतात. त्यानंतरच निष्कर्ष काढला जातो. नवीन पुरावे मिळाले तर आधीच्या निष्कर्षात योग्य तो बदल केला जातो. त्याच्या मर्यादा मान्य केल्या जातात. स्थापत्यशास्त्राशी नाते सांगणारे फसवे वास्तुशास्त्र सध्या खूपच लोकप्रिय होत आहे. त्यात आग्नेय दिशेला अग्नी म्हणजे शेगडी, चूल असावी तर पश्चिम दिशेला वेस्टपेपर बास्केट असावे म्हणजे घरात समृध्दी नांदेल, असे हास्यास्पद दावे केले जातात. लोक अशा फसव्या छद्म विज्ञानाच्या मागे का जातात, तेही पाहिले पाहिजे. माणूस हा उपजतच एक भावनाशील प्राणी आहे. कशावर तरी श्रध्दा ठेवावी, अशी त्याची मानसिकता असते. प्रश्न विचारणे, खरे–खोटे पारखणे या गोष्टी त्याला शिकवाव्या लागतात. सतराव्या शतकाच्या सुरुवातीला विज्ञानाचा उदय झाल्यावर विविध प्रकारच्या ऊर्जांचा शोध लागला. जेम्स वॅट यांचा वाफेच्या ऊर्जेचा शोध प्रसिध्द आहे. अणू ऊर्जा, सूर्य ऊर्जा, आघातातून निर्माण होणारी ध्वनी ऊर्जा अशा विविध ऊर्जा भौतिक शास्त्रात अभ्यासल्या जातात. या ऊर्जा मोजण्याची शास्त्रीय एकके असतात. जसे ध्वनी ऊर्जा ही डेसिबल्समध्ये तर विद्युत शक्ती वॉटस्मध्ये मोजतात. परंतु छद्म विज्ञानामध्ये मंगळ, शनी अशा ग्रह गोलांपासून वैश्विक ऊर्जा निघते आणि ती निवडक माणसांचे भविष्य ठरविते,

पान १ वरुन

### जिल्हा सामाजिक कार्य समिती

मार्डी उत्तर सोलापूर) यांची निवड करण्यात आली आहे. सन्मानपत्र, गौरव चिन्ह, शाल व पुष्पगुच्छ असे या गुणवंत शिक्षक पुरस्काराचे स्वरूप असून निवृत्त शास्त्रज्ञ होमी भाभा समाज विज्ञान केंद्र प्रा.डॉ.व्यंकटेश गंभीर यांच्या हस्ते, तर कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ.अश्विन बोंदार्डे यांच्या अध्यक्षते खाली बुधवार दिनांक ४ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी ठीक तीन ३-३० वाजता अशोक चौक येथील कस्तुरबाई शिक्षण शास्त्र महाविद्यालय येथील सभागृहात पुरस्काराचे वितरण होणार आहे. अशी माहिती पुरस्कार निवड समितीचे समन्वयक प्रा.डॉ. श्रीकांत येळेगावकर, सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समितीचे अध्यक्ष उल्हास पाटील, फॅमिली असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी दिली आहे.

### भादलवाडी तलाव शेतकरी व

येथील तलावाच्या पाण्याचे जलपूजन व मत्स्यबीज सोडण्याच्या कार्यक्रम हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते रविवारी संपन्न झाला. सदर प्रसंगी हर्षवर्धन पाटील यांनी तलाव पूर्ण क्षमतेने भरले बद्दल आनंद व्यक्त केला व प्रत्येक वर्षी तलाव भरला जावा व परिसरातील शेतकरी, मच्छीमार भुई समाज आनंदी राहावा, अशी सदिच्छा व्यक्त केली. या तलावाचा डाळज, भादलवाडी, कुंभारगाव, पिलेवाडी, तक्रारवाडी आदी परिसरातील शेतकरी व नागरिकांचा फायदा होत आहे. या तलावाच्या पाण्यावरती नळ पाणीपुरवठा योजनाही अवलंबून आहेत. आज तलावामध्ये मत्स्यबीज सोडण्याचा आले असून, त्यामुळे मच्छीमार संस्थांना फायदा होणार आहे त्यासाठी मच्छ विभागाचे सहकार्य लाभल्याचे हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले. या जल पुजन व मत्स्यबीज सोडण्याच्या कार्यक्रमास पदाधिकारी, अधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

### मविआचं जोडे मारो आंदोलन

ऑफ इंडियाच्या दिशेने रवाना झाले. तसंच गद्दारांना माफी नाही, शिवद्रोहींना माफी नाही अशा घोषणाही यावेळी देण्यात आल्या. मविआच्या या मोर्चाला पोलिसांनी परवानगी दिली नव्हती. मात्र आज रविवारचा दिवस आहे. या भागातील

## बैल पोळा

**दैनिक यशसिद्धी न्यूज नेटववर्क**

उमरगा/ज्ञानेश्वर गुरव : दरवर्षी श्रावण अमावस्या दिवशी बैल पोळा साजरा केला जातो. या दिवसाला पिठोरी अमावस्या देखील म्हणतात. पोळ्याच्या दिवशी वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलाला नांगरापासून आणि शेतीपासून आराम दिला जातो. बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा हा एक मराठी सण आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर हा बैल पोळ्याचा सण साजरा केला जातो. महाराष्ट्रासह , विदर्भातील सीमेवर असलेल्या मध्य प्रदेश व तेलंगण सीमाभागात सुद्धा हा सण साजरा होतो.संपूर्ण देशभरात विविध नावांनी पोळा साजरा केला जातो. महाराष्ट्रात हा सण बैलपोळा नावाने साजरा केला जातो. आपला देश कृषीप्रधान असून, शेतकरी हा आपल्या देशाचा अतिशय महत्त्वाचा भाग आहे. सर्वच शेतकऱ्यांचा जिवाभावाचा मित्र म्हणून बैलाला ओळखले जाते. याच बैलामुळे शेतकऱ्याला शेतातील पिक पिकवण्यासाठी मोठी मदत होते. त्यामुळे या दिवशी महाराष्ट्रात बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बैलपोळा




साजरा करण्याची पद्धत आहे.

या दिवशी बैलांना जेवणासाठी पुरणपोळी करत नैवेद्य दाखवला जातो. प्रत्येक शेतकरी आपल्या शेतकरी बैलांचा साजशृंगार करतात. त्यांची मिरवणुक काढतात. घरातील स्त्रिया बैलांचे औक्षण करतात. या दिवशी प्रत्येक घराला आंब्याच्या पानांचे तोरण बांधले जाते. गावातल्या सर्व बैलजोड्या, वाजंत्री, सनई, ढोल, ताशे वाजवत एकत्र आणल्या जातात.

## सुयश वाळेकर यांची पुणे येथील बी.जे. मेडिकल कॉलेजला एमबीबीएससाठी निवड!

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

नगर : अहमदनगर संगमनेर अकोले विधानसभा मतदारसंघातील भुमिपुत्र तथा सातारा जिल्ह्यातील वाई येथील दिशा जुनियर कॉलेजचा विद्यार्थी सुयश साईनाथ वाळेकर याची पुणे येथील नामांकित बी.जे. मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएससाठी निवड झाली आहे. राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (छएएढ) मधून सुयशने पहिल्या फेरीतूनच आपला प्रवेश निश्र्चित केला आहे. सुयशने नीट परीक्षेत तब्बल ५७५ गुण मिळवले असून, यामुळे त्याला बी.जे. मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला आहे.सुयशने आपल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत देखील उत्कृष्ट कामगिरी केली होती. त्याला ९४ टक्के गुण मिळाले होते, जे त्याच्या कठोर परिश्रम आणि योग्य नियोजनाचे फलित आहे. दिशा जुनियर कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना सुयशने अभ्यासाचे वेळापत्रक तयार केले होते आणि त्यानुसार विषयानुसार अभ्यास केला होता. सुयशच्या यशस्वी प्रवासात त्याला दिशा जुनियर कॉलेजचे संस्थापक नितीन कदम सर, मार्गदर्शक शिक्षक श्री शर्मा सर, दुबेसर, अभिषेक सर यांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन मिळाले. त्याचप्रमाणे, सुयशच्या यशात त्याच्या कुटुंबाचेही मोठे योगदान आहे. त्याची आई सौ. मीनाक्षी वाळेकर या वाईतील नगरपालिका



शाळा क्रमांक ४ मधील मुख्याध्यापिका आहेत, तर वडील श्री. साईनाथ वाळेकर हे पंचायत समिती वाईचे गटशिक्षणाधिकारी आहेत. सुयशला बी.जे. मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएससाठी प्रवेश मिळाल्याबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. समाजातील विविध व्यक्तींनी त्याच्या या यशस्वी प्रवासाबद्दल अभिनंदन केले आहे. सुयशचा हा प्रवास इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे.त्याच्या या यशाबद्दल महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे राज्य सरचिटणीस डॉ विश्र्वास आरोटे उत्तर महाराष्ट्र विभागीय सचिव अनिल रहाणे मराठवाडा विभागीय संपर्कप्रमुख कुंडलिक वाळेकर जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरेअध्यक्ष अशोक उगले .

## शाळा व्यवस्थापन समिती'च्या अध्यक्षा सौ.गोरीबी मकानदार यांचे निवड

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधीः न.प.वरिष्ठ प्राथमिक सेंट्रल, अक्कलकोट येथे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना 'शाळा व्यवस्थापन समिती'च्या अध्यक्षा सौ.गोरीबी मकानदार व सदस्य मल्लिकार्जून बिराजदार,राजशेखर रामपूरे आणि इतर पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत शासनातर्फे मिळालेल्या मोफत गणवेश वाटपचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून प्रारंभी प्र.मुख्याध्यापक श्री.सिध्दाराम पुजारी यांनी आपल्या प्रास्ताविकेतून शासनाकडून विविध उपक्रमाबद्दल माहिती सांगितली यामध्ये मोफत गणवेश, मोफत पाठ्यपुस्तक, मोफत शालेय पोषण आहार, मोफत एक जोड बूट व दोन जोडी पायमोजे मिळत असल्याचे सांगून न.प.वरिष्ठ प्राथमिक शाळेत अकरा मोफत संगणक आले असून श्री दलित




सोनकांबळे सर व तंत्रनिकेतन शिक्षक श्री.ज्ञानेबा केंद्रे सर,श्रीम.सविता शिंदे मॅडम यांच्या मार्गदर्शनाने क्लासही चालू असल्याचे सांगितले आहेत. याबद्दल विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक बदल घडत असल्याने उपस्थित पालक वर्गात आनंद पसरले आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री केंद्रे सर यांनी केले असून कार्यक्रमांस उपस्थित राहून शोभा आणल्याबद्दल उपस्थित पालकांचे व मान्यवरांचे सौ.दिलशाद कलबुर्गे मॅडम यांनी सर्वांचे आभार मानले.

## न्यासाकडून विविध क्षेत्रात होत असलेली प्रगती नेत्रदिपक : धनेश स्वामी

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून विविध क्षेत्रात होत असलेली प्रगती नेत्रदिपक असल्याचे मनोगत संरक्षण मंत्रालय नई दिल्ली चे पुणे एअरपोर्ट चे प्रभारी आय.ए.एस. धनेश स्वामी (युपिएसी २०१५) यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे सचिव शामराव काका मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी ते बोलत होते.

त्यांच्या समवेत मैंदर्गीचे सुपुत्र व मुंबई उच्च न्यायालयाचे विधीज्ञ ॲड. विश्र्वनाथ पाटील, नितीन हिंडोळे, उद्योजक प्रकाश वाघमोडे, शशिकांत कुंभार हे उपस्थित होते.यावेळी न्यासाचे पुरोहित अप्पू पुजारी, सिद्धाराम कल्याणी, प्रवीण घाडगे, आतिश पवार, गोटू माने, मल्लिकार्जुन बिराजदार,



शहाजीबापू यादव, पिंटू साठे, बाळासाहेब घाटगे, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, शरद भोसले, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, शिव स्वामी, एस.के. स्वामी, धनंजय निंबाळकर, विशाल घाटगे, तानाजी पाटील, अनिल बिराजदार, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, विठ्ठल रेड्डी यांच्या सह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रीय अल्पसंख्याक पिछडा वर्ग संगठन जिल्हा संपर्क प्रमुखपदी गजानन कहाळे यांची निवड

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

बुलढाणा/राहुल साबळे : सिंदखेड राजा तालुक्यातील गजानन कहाळे बऱ्याच वर्षांपासून तालुक्यातील सर्व समाजातील लोकांशी चांगला परिचयाचा व्यक्ती गजानन कहाळे हा सर्व सामान्य जनतेसाठी नेहमी लढवय्या



व गोर गरिबांना न्याय मिळून देणारा अवलिया याची आज राष्ट्रीय अल्पसंख्यांक पिछडा वर्ग संगठन महा. राज्य प्रदेश अध्यक्ष शेख सईद शेख कदिर यांच्या हस्ते बुलढाणा जिल्हा संपर्क प्रमुख या पदी आज नियुक्ती पत्र देऊन संघटनेच्या वरील पदी निवड करण्यात आली आहे मात्र गजानन कहाळे हे आपल्या पत्रकारी तेच्या माध्यमातून तर त्याची अगोदरच ओळख तालुक्यात तर आहेच परंतु त्यानी बऱ्याच लोकांचे कामे सुद्धा करून दिलेली आहेत व इतर मागास वर्गावर व सर्वसामान्यवर होणाऱ्या अन्याय विरुद्ध नेहमी सातत्याने लढणारा व्यक्ती नेहमी बऱ्याच लोकांच्या संपर्कात असल्यामुळे वत्यांचा जनसंपर्क सुद्धा तसा दांडगा असल्याने आता नकीच संघटनेच्या माध्यमातून सुद्धा काही नागरिकाचे प्रलंबित असलेले कामे सुद्धा तात्काळ मार्गी लागतील या आशेने आज मात्र त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव सुद्धा होत आहे

कार्यालयांना सुट्टी आहे. असं असताना आमच्या आंदोलनाला परवानगी का नाही? असा सवाल महाविकास आघाडीने केला. त्यानंतर हा मोर्चा अडवला जाणार नाही, अशी भूमिका पोलिसांनी घेतली. लावलेले बॅरिगेटही हटवण्यात आले आहेत. हा मोर्चा आता गेट वे ऑफ इंडियाच्या दिशेने रवाना झाला. उद्धव ठाकरे, शरद पवार, नाना पटोले यांच्यासह शेकडो कार्यकर्ते या मोर्चात सहभागी झाले आहेत.

उद्धव ठाकरे म्हणाले की, शिवाजी महाराजांचा पुतळा हवेतून कसा पडला? राज्यात भ्रष्टाचारात गुंतलेले सरकार सुरू आहे. स्मारकाच्या कामात कोट्यवधींचा भ्रष्टाचार झाला आहे. पुनर्बांधणीच्या नावाखाली करोडोंचा भ्रष्टाचार होणार आहे. मी त्यांना शिवाचा गद्दार म्हणेन. शरद पवार म्हणाले की, पुतळ्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. राज्य सरकार आपल्या जबाबदारीपासून पळ काढू शकत नाही. ही बाब गंभीर आहे.काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, सिंधुदुर्गात पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी स्वत: पंतप्रधान मोदी, संरक्षणमंत्री आणि मुख्यमंत्री आले होते. मूर्ती बनवण्याचा नियम आहे, परवानगी घ्यावी लागते. हे शिवविरोधी लोक आहेत. सरकारच्या चुकीच्या धोरणांचे कारण आणि डीजी पदावर महिला अधिकाऱ्याची नियुक्ती का करण्यात आली आहे. डीजी रश्मी शुक्ला भाजप आणि आरएसएसचा अजेंडा चालवत आहेत.

### महाविकास आघाडीला निवडणुकीत ..

उतरलं आहेत. यावेळी 'जय भवानी, जय शिवाजी'चा जयघोष केला. 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' असं म्हणत शेकडो कार्यकर्ते गेट वे ऑफ इंडियाच्या दिशेने रवाना झाले. तसंच गद्दारांना माफी नाही, शिवद्रोहींना माफी नाही

अशा घोषणाही यावेळी देण्यात आल्या. या मोर्चात शरद पवार, उद्धव ठाकरे, नाना पटोले सहभागी झाले आहेत. हुतात्मा स्मारकाला अभिवादन करुन हा मोर्चा काढण्यात आला. मात्र हा मोर्चा शिवरायांच्या प्रेमासाठी नाही तर राजकीय हेतूने प्रेरित आहे असं म्हणत एकनाथ शिंदेंनी आंदोलन करणाऱ्या महाविकास आघाडीला उत्तर दिलं आहे.

महाविकास आघाडीचं आंदोलन राजकीय हेतूने प्रेरित आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. ही अतिशय वाईट आणि दुःखद घटना आहे. आमच्यासाठी ही बाब संवेदनशील आहे. तमाम महाराष्ट्राचे शिवभक्त या घटनेने भावनिक झाले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज हे आमच्यासाठी राजकीय मुद्दा नाहीत. छत्रपती शिवाजी महाराज हा आमच्या अस्मितेचा विषय आहेत. मात्र घडलेल्या घटनेचं राजकारण करणं हे विरोधक करत आहेत. हे जास्त दुर्दैवी आहे. असं एकनाथ शिंदे म्हणाले.

कर्नाटकात काँग्रेस सरकारने बुलडोझर लावून छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा जेसीबी लावून तोडण्यात आला. आता तेच काँग्रेसवाले आंदोलन करत आहेत. या काँग्रेसवाल्यांनाच खरंतर जोड्याने किंवा चपलेने मारलं पाहिजे.

ते सोडून आता मुंबईत आंदोलन करत आहेत. मात्र महाराष्ट्राची जनता समजदार आहे. त्यांना पराभव दिसू लागला आहे. येत्या निवडणुकीत महाविकास आघाडीला जनता जोड्याने मारणार आहे. असंही एकनाथ शिंदेंनी म्हटलं आहे.मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या विरोधात हे लोक कोर्टात गेले. आधी मुंबई उच्च न्यायालयात गेले, आता नागपूर खंडपीठात गेले. गरीब भगिनींना आम्ही पैसे देत आहोत तर यांच्या पोटात का दुखतं?असा सवाल मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी केला आहे. तसंच यावरुन यांची मानसिकता समजते असंही एकनाथ शिंदे म्हणाले आहेत.




## टाकळीवाडी येथे पंचर दुकान फोडून २५ हजाराचा मुद्देमाल लंपास

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

टाकळीवाडी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील बस स्टॅन्ड जवळील श्रीकांत निर्मळे यांच्या पंक्चर दुकानातून अज्ञात चोरट्याने नवीन टायर ८ नग, मोठा जॅक १नग, असा सुमारे २५ हजार रुपयांचा माल अज्ञात चोरट्याने ०१/०९/२०२४ रोजी रात्री घटना घडली असून टाकळीवाडी मध्ये चोरीचे प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.८/१० दिवसापूर्वी विजय काने यांच्या घराचे कुलूप तोडण्याचा प्रयत्न झाला होता. गावामध्ये भीतीची वातावरण पसरलेली आहे.या चोरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकातून जोर धरत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# नळदुर्ग येथील शासकीय विश्राम गृहाची दयनिय अवस्था

**दैनिक यशसिद्धी न्युज**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ लगत असलेल्या नळदुर्ग हे ऐतिहासिक शहर म्हणून ओळखले जाते हे शासकीय विश्रामगृह गेल्या अनेक वर्षापासून बंद अवस्थेत असल्यामुळे त्याची खुप मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आसल्याचे दिसुन येत आहे. शासकीय विश्रामगृहाच्या आतमधील परिसरात काट्याची झुडपे वाढले असून गवत व पालापाचोळा मोठ्या प्रमाणात साचला आहे. या शासकीय विश्रामगृहाकडे शासनाची पूर्णपणे जाणीवपूर्वक डोळेझाक होत असल्याचे दिसून येत आहे

नळदुर्ग शहर एक ऐतिहासिक शहर आसुन या शहरात प्रशासन आसुन आड थाळा नसुन खोळंबा आशी दयनिय अवस्था या विश्राम गृहाची झाली आसून प्रशासन जाणीव पूर्वक या शहरांतील विश्राम गृहकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे . त्याचबरोबर या ठिकाणी सफाई कामगार शिपाई किंवा चौकीदार नसल्यामुळे

या विश्राम गृहाकडे नागरीकांचे येणे जाणे पूर्णपणे बंद झाल्यामुळे काही वर्षां पूर्वी डाक बंगला या नावाने प्रसिद्ध असलेल्या नळदुर्गच्या शासकीय विश्रामगृहाची श्र्वानासह इतर मोकाट जनावरांचा वावर वाढल्याने विश्रामगृह परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने या विश्रामगृहाची तात्काळ दुरुस्ती व स्वच्छता करून विश्रामगृहाला गत वैभव प्राप्त करून द्यावी अशी मागणी होत आहे. नळदुर्ग येथे प्राचीन व ऐतिहासिक किल्ला आहे .या ऐतिहासिक कल्ल्यात दररोज हजारो पर्यटक पर्यटनासाठी येतात लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री खंडोबा देवस्थान, श्रमदानातून तयार केलेले धाराशिव जिल्ह्यातील सर्वात मोठे बौद्ध विहार आहे .श्री क्षेत्र रामतीर्थ आहे , संपूर्ण महाराष्ट्रातून अनेक भक्त नळदुर्ग नानीमाँ सरकार दर्गाहात येतात तसेच नळदुर्ग हे शहर तुळजापूर व अक्कलकोट या तीर्थक्षेत्रांना मध्यवर्ती ठिकाण आहे. त्यामुळे तुळजाभवानी माता व श्री स्वामी समर्थ यांच्या दर्शनाला जाणारे भाविक तसेच ऐतिहासिक किल्ला पाहण्यासाठी येणारे पर्यटन नळदुर्ग शहरात आल्यानंतर विश्रांतीसाठी पूर्वी याच शासकीय विश्रामगृहात आराम घेण्यासाठी थांबत आसत मात्र सध्या हे विश्रामगृह बंद अवस्थेत असल्यामुळे नळदुर्ग शहरात येणाऱ्या पर्यटकासह भाविकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आसल्यचे दिसुन येत आहे या विश्रामगृहामध्ये १ व्हीआयपी सुटसह ४ जनरल सुट आहेत. मात्र सध्या त्याची खुप मोठी

*** शासकीय विश्राम गृहाकडे प्रशासनाची डोळेझाक * पुर्विच्या डाक बगल्याकडे आमदार व खासदारांनी लक्ष देण्याची गरज**




दुरवस्था झाली आहे .

या शहराकडे खरे तर धाराशिव जिल्ह्याचे खासदार ओमराजे निंबाळकर व तुळजापूर तालुक्याचे लोकप्रिय आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी या पुर्वीच्या डाक बंगल्याच्या इमारती कडे जातीने लक्ष घालून हे ऐतिहासिक शहरातील अनेक वर्षापासुन धुळ खात पडून असलेले विश्रामगृह तात्काळ चालु करण्या संदर्भात आदेश देण्यात यावा आशी मागणी शहरातील नागरीकानी जोर धरला आहे.

नळदुर्ग शहराचा ऐवढा मोठा विकास होतो मग शासकीय विश्रामगृह का चालू होत नाही आसे नागरीकातून बोलले जात आहे . आगर हे काम पूर्ण झाले तर शहराला एक गत वैभव प्राप्त होईल आणी नागरीकात समाधान व्यक्त केले जाईल .

# मॉडर्न पेटीथलोन स्पर्धेत एमआयटी गुरुकुल स्कूल मुलांचा विजय



**दैनिक यशसिद्धी न्युज**

पंढरपूर/प्रतिनिधी : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मार्कंडे जलतरंग तलाव सोलापूर येथे आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत एमआयटी गुरुकुल स्कूलचा विजय झाला.शाळेतील मुलांची नावे सतरा वर्षाखालील मुले ओम अविनाश पाटील प्रथम क्रमांक, सुजल सुखदेव कदम द्वितीय क्रमांक व १७ वर्षे खालील मुले संस्कृती प्रमोद कटारिया प्रथम क्रमांक, आलिया मोलाची द्वितीय क्रमांक वरील सर्व विद्यार्थ्यांची पुणे येथील विभाग स्तरीय स्पर्धेसाठी निवड. विजय शाळेचे क्रीडा शिक्षक म्हणून भूषण तायडे, पल्लवी पाटील, आणि कविता कटारिया यांचे मार्गदर्शन लाभले शाळेचे प्राचार्य शिवाजी गवळी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा

# कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात इतिहास चर्चासत्राचे आयोजन

**दैनिक यशसिद्धी न्युज**

पंढरपूर/प्रतिनिधी : येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात सोमवार दिनांक २ सप्टेंबर २०२४ रोजी रुसा कंपोनंट आठ अंतर्गत इतिहास विभागाच्या वतीने 'भक्ती चळवळ: ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि तात्विक दृष्टिकोनातून अभ्यास' या विषयावर एक दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे यांनी दिली आहे.

प्रसिद्ध पत्रकात माहिती देताना ते पुढे म्हणाले की, या एक दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव (ऑडीट) तथा छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे हे उपस्थित राहणार आहेत. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे असतील. हे चर्चासत्र एकूण तीन सत्रामध्ये संपन्न होणार असून 'संत साहित्यामधील संत तुकारामांचे योगदान' या विषयावरील सत्रात कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे तज्ज्ञ म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. या सत्राच्या अध्यक्षस्थानी पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखेचे सेवानिवृत्त अधिष्ठाता डॉ. विकास कदम हे असतील 'स्त्री मुक्तीच्या दिशेने भक्ती पंथ' या विषयावरील सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथील इतिहास विभाग प्रमुख डॉ. पुष्पा गायकवाड ह्या तज्ज्ञ म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. या सत्राच्या अध्यक्षस्थानी व पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष तथा श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी येथील इतिहास विभाग प्रमुख डॉ. विष्णू वाघमारे हे अध्यक्ष आहेत.

कार्यक्रमाच्या समारोप सत्रात तुळजापूर येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. सतीश कदम हे प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करणार आहेत तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे हे आहेत. या चर्चासत्रात सहभागी होणाऱ्या प्राध्यापक, शिक्षक आणि संशोधक विद्यार्थी यांना भक्ती चळवळीच्या संबंधित विषयावर संशोधन पेपर सादर करता येतील. हे चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी या चर्चासत्राचे समन्वयक प्रा. डॉ. दत्तात्रय चौधरी, प्रा. श्रीमती सुमन केंद्रे, प्रा. कल्याण वाटाणे, डॉ. उमेश साळुंखे, प्रा. बाळासाहेब गायकवाड, डॉ. भारती सुडके, प्रा. विनोद आखाडे प्रा. मयूर चव्हाण आदी शिक्षक तर अभिजित जाधव, ओंकार नेहतराव, अमोल माने, सुरेश मोहिते आदी शिक्षकेतर सेवक पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील इतिहास विषयाच्या आणि भक्ती चळवळीचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांनी या परिषदेमध्ये सहभागी व्हावे. असे आवाहन इतिहास विभाग प्रमुख डॉ. रविराज कांबळे यांनी केले आहे.



# गणेश उत्सवानिमित्त शांतता कमिटीची बैठक संपन्न

**दैनिक यशसिद्धी न्युज**

पंढरपूर/प्रतिनिधी : आगामी काळात दिनांक ७/९/२०२४ ते दिनांक १७/७/२०२४ या कालावधीमध्ये श्री गणेश उत्सव सर्वत्र साजरा केला जाणार असल्याचे त्या अनुषंगाने अकलूज पोलीस ठाणे व अकलूज नगरपरिषद यांच्या वतीने सार्वजनिक गणेश मंडळ अध्यक्ष व पदाधिकारी शांतता कमिटी सदस्य महिला दक्षता समिती सदस्य गणेश मूर्ती विक्रेते अकलूज पोलीस ठाणे हद्दीतील सर्व पोलीस पाटील पत्रकार बांधव ज्येष्ठ नागरिक यांची दिनांक नगरपरिषद कार्यालय अकलूज येथे शांतता कमिटीची बैठक घेण्यात आली सदर बैठकीमध्ये नगरपरिषद सी. ई.औ. दयानंद गोरे, अकलूजचे माजी ग्रामपंचायत सदस्य पत्तेशीय माने पाटील, अक्रूर नगरपरिषद व अकलूज पोलीस ठाणे यांच्यातर्फे आयोजित सर्वोत्कृष्ट गणेश उत्सव मंडळ निवड समितीचे परीक्षक जेष्ठ पत्रकार भागवंत नायकुडे व अकलूज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भानदास निंभोरे यांच्या उपस्थितीत आगामी गणेश उत्सव मंडळाचे अनुषंगाने सर्व गणेश मंडळांना ऑनलाइन परवानगी घेण्याबाबत डॉल्बी डीजे न लावता पारंपारिक वाद्य वाजवून प्रदूषण मुक्त या पर्यावरण पूरक वातावरणामध्ये गणेशोत्सव साजरा करण्याबाबत सामायिक तेढ निर्माण करणारे देखावे सादर न करण्याबाबत गणेश मूर्तीचे महावितर राखण्याचे अनुषंगाने आवश्यक ती उपायोजना करून

गणेशोत्सव मंडळामध्ये आवश्यक त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याबाबत वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही अशा रीतीने मूर्ती स्थापन करण्याबाबत तसेच जिल्हा स्तरीय उत्कृष्ट गणपती उत्कृष्ट समाज उपयोगी देखावा याबाबत शासन स्तरावर असलेली बक्षीस योजनेबाबत वाकून नगरपरिषद व अकलूज पोलीस ठाणे यांच्यातर्फे आयोजित सर्वोत्कृष्ट गणेश उत्सव मंडळ निवड याबाबत योग्य ते मार्गदर्शन करण्यात आलेले आहे

# गुजनूर येथे आरोग्य शिबीरा सह विविध उपक्रमाने साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**दैनिक यशसिद्धी न्युज**

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील मौजे गुजनूर येथे आरोग्य शिबीरा सह विविध उपक्रमाने साहित्य सम्राट लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली असून भव्य मिरवणूकीने जयंती उत्सवाची सांगता करण्यात आली. साहित्य रत्न आण्णा भाऊ साठे जयंती उत्सव कमिटी गुजनूर व जि.प.प्राथमिक आरोग्य केंद्र नळदुर्ग ता.तुळजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने लोकशाहीर डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त गुजनूर येथ मोफत आरोग्य तपासणी, प्रथमोपचार व आरोग्य सल्ला शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जि.प.प्राथमिक आरोग्य केंद्र नळदुर्गच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.श्रद्धा कदम, नेत्र चिकित्सक डॉ.आनंद काटकर,आरोग्य सेविका रमा गोभांळे, छकुली राठोड,आर.एन.पवार,सुरज ढेरे यांनी आरोग्य तपासणी चे काम पाहिले. शेवटी साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची गावातून भव्य मिरवणूक काढून जयंती उत्सवाची सांगता करण्यात आली. याप्रसंगी सरपंच फुलचंद वाघमारे,उप सरपंच व्यंकट साळुंखे,जयवंत वाघमारे,कुमार पाटील सविता मुलगे,छमाबाई नागमोडे,सुमन मोरे, प्रगती नागमोडे,भाग्यश्री माने,उत्तम नागमोडे, जिल्हा परिषद शिक्षक भंडारवाड सर,अशा कार्यकर्त्या,प्रतिभा वाघमारे,रकमा बाई, वाघमारे,कांचन वाघमारे, मल्लू वाघमारे विलास मोरे ,नामदेव मोरे, सुरेश मुलगे, मंगलबाई साळुंखे, ऋतुजा माने, शांताबाई साळुंखे सोनीका मोरे गीता मोरे,औदुंबर पाटील,एकनाथ पाटील दामू नागमोडे सह साहित्य रत्न आण्णा भाऊ साठे जयंती उत्सव कमिटीचे महादेव मोरे सह सर्व पदाधिकारी कार्यकर्ते ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# करमाळा विधानसभेवर भगवा फडकणारच : महेश चिवटे

**दैनिक यशसिद्धी न्युज**

करमाळा/प्रतिनिधी : तालुक्यातील स्वार्थी व लबाड पुढाऱ्यांनी ठेकेदार व आपली बगलबच्चे मोठे करण्याचे राजकारण करून सर्वसामान्यांची घोर फसवणूक केली

यामुळे आता एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली धनुष्यबाणावर करमाळा विधानसभा लढवून भगवा फडकवणारच असा दावा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी केला. बांधकाम कामगारांच्या ६०१ सदस्यांना भांडी वाटप नोंदणी अर्ज भरून घेण्याच्या कार्यक्रमात ते बोलत होते

यावेळी व्यासपीठावर गटविकास अधिकारी मनोज राऊत यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे अध्यक्ष प्राध्यापक मिलिंद फंड भाजप व्यापारी आघाडीचे अध्यक्ष कुलकर्णी शिवसेनेचे तालुकाप्रमुख राहुल कानगुडे उपजिल्हाप्रमुख अनिल पाटील शहर प्रमुख संजय शीलवंत महिला आघाडी उपाध्यक्ष ज्योतीताई शिंदे शिवसेना ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश करचे युवासेना जेऊर शहर प्रमुख माधव सूर्यवंशी वैद्यकीय कक्ष प्रमुख नागेश शेंडगे आधी पदाधिकारी उपस्थित होते

यावेळी बोलताना महेश शेवटी म्हणाले कीमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीण योजना आणून प्रत्येक बहिणीला भाऊ म्हणून आधार दिला आहे करमाळा तालुक्यात ४६००० लाडकी बहिणीची नोंद झाली असून यापैकी ३४००० बहिणींच्या खात्यावर पैसे गेले आहेत अजून किमान २५ ते ३० हजार लाडक्या बहिणीची नोंदणी बाकी आहे

त्यांना या हप्त्यात पैसे आले नाहीत त्यांना पुढील हप्त्यात थेट ४५०० जमा होणार आहेत वयाश्री योजनेमार्फत प्रत्येक वृद्धाला तीन हजार रुपये दिले जात आहेत

एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्यासाठी करमाळ्यातील शिवसेनेचा आमदार निवडून जाणे गरजेचे आहे त्यासाठी शिवसेनेच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांना जो लाभ मिळाला आहे ते लोक शिवसेनेच्या पाठीमागे उभा राहतील असा विश्र्वास व्यक्त केला

यावेळी प्राचार्य मिलिंद फंड यांनी तडाखे बंद भाषण करून राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेसच्या अफवाला बळी पडू नका जोपर्यंत एकनाथ शिंदे मुख्यमंत्री आहे तोपर्यंत लाडक्या बहिणीला महिना दीड हजार मिळणार उलट हा आकडा मेहनत ३००० पर्यंत जाईल त्यासाठी सर्व महाराष्ट्रातील महिलांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पाठीशी उभे राहावे असे आवाहन केले

यावेळी नवीन १३०० बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात आली शिवसेनेच्या वतीने यापूर्वी जवळपास २७०० बांधकाम कामगारांना लाभ देण्यात आला आहे





**वैद्यकीय मदत पक्षाच्या माध्यमातून तालुक्यातील रुग्णांना जवळपास दोन कोटी रुपयांची मदत झाली आहे अडचणीच्या काळात सर्वसामान्यांना धावून जाणारी नेतृत्व म्हणून महेश चिवटे आज सर्वसामान्यांचा आधार झाले आहेत यामुळे त्यांना विधानसभेत पाठवण्यासाठी सर्व शिवसैनिकांनी व उपस्थित महिलांनी आजपासूनच कामाला लागावे असे आव्हान शिवसेना उपजिल्हाप्रमुख ज्योतीताई शिंदे यांनी केले**

**एका घरात दोन तास कपडे धुणे भांडी केल्यानंतर महिना आम्हाला पाचशे रुपये मिळतो आज आम्हाला ३००० रुपये मिळाले असून वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत मिळणार आहेत ही सर्व कृपा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या असून करमाळा तालुक्यातील या योजनेचा लाभ घेणाऱ्या ४२००० महिला एकनाथ शिंदे यांचे उमेदवार महेश चिवटे यांनाच मतदान करणार असा विश्र्वास महिला आघाडीच्या तालुका उपाध्यक्ष सुनीता गोडगे यांनी व्यक्त केला**

# वृक्ष संवर्धन ही काळाची गरज : महंत रामगिरीजी महाराज

**दीक्षाभूमी ते मंत्रालय संवाद यात्रा यशस्वी केल्याबद्दल डॉ विश्र्वासराव आरोटे यांचा सरला बेट चे महंत रामगिरी महाराज यांच्या हस्ते सन्मान..आरोटे.. यांचे कार्य कौतुकास्पद**



**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

श्रीरामपुर/प्रतिनीधी : श्रीरामपुर तालुक्यातील श्री क्षेत्र सरला बेट या ठिकाणी महाराष्ट्र राज्यपत्रकार संघ डॉ विश्र्वासराव आरोटे यांचे मार्गदर्शनाखाली वृक्ष संवर्धन संदेश व लक्ष्मीतरू या वृंक्षाचे १ हजार सिड बॉल व वृक्ष वितरण करण्यात आले प्रसंगी डॉ विश्र्वासराव आरोटे श्री संदिप कसार सर यांनी महंत गुरुवर्य रामगिरीजी महाराज यांचा सन्मान केला... तर दीक्षाभूमी ते मंत्रालय ही सहा हजार किलोमीटर संवाद यात्रेमध्ये पत्रकारांचे प्रश्र्न घेऊन केंद्र सरकार व राज्य सरकारकडे मागणी करत ही यात्रा यशस्वी केल्याबद्दल यावेळी सरला बेट चे महंत रामगिरी महाराज यांच्या हस्ते डॉक्टर विश्र्वासराव आरोटे यांचा शाल पुष्पगुच्छ श्रीफळ देऊन रामगिरी महाराज यांनी सत्कार केला तर केंद्र व राज्य सरकार नक्कीच पत्रकारांचे प्रश्र्न मार्गी लागेल असा मला आशावाद आहे यावेळी सांगितले.. याप्रसंगी वृक्ष संवर्धन ही काळाची गरज असून लक्ष्मी तरुचे वृक्ष १००% ऑक्सिजन देणारी वनस्पती असल्याने करोणा महामारी आजाराच्या कालावधीत सदर वृक्षांचा देशात तसेच राज्यात मोठ्या प्रमाणावर उपयोग झाला तसेच वृक्ष लागवड ज्या ठिकाणी जास्त प्रमाणावर आहे अक्षा ठिकाणी पर्जन्यमान अधिक असल्याचे आढळून आल्याचे महंत रामगिरीजी महाराज यांनी सांगितले तसेच पत्रकार संघटनेचे डॉ विश्र्वासराव आरोटे यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन करत श्री श्री रविशंकर शाळेचा उपक्रम अभिमानास्पद असल्याने त्यांनाही धन्यवाद व्यक्त केले लक्ष्मी तरू वृक्षांचे अनन्य साधारण महत्व असल्याने श्री क्षेत्र सराला बेट गोदाधाम महंत रामगिरीजी महाराज यांचे शुभहस्ते अभियानाचा शुभारंभ करण्यात आला

श्री श्री रविशंकर विदया मंदिर संस्थेचे अध्यक्ष संदिप कसार यांच्या संकल्पनेतुन शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर वृक्षाचे शिडबॉल तयार करून घर तेथे लक्ष्मी तरुचे वृक्ष असा उपक्रम राबविण्यात येत आहे . सध्या अहमदनगर जिल्हा स्तरावर लवकरच पत्रकार बांधव यांना लक्ष्मीतरू वृक्ष भेट देणार आहे यासाठी वडाळा महादेव येथील श्री श्री रविशंकर विद्या मंदिर शाळा तसेच श्रीरामपुर तालुका पत्रकार संघ प्रयत्नशील आहेत प्रसंगी डॉ विश्र्वासराव आरोटे साहेब विश्र्वस्त सराला बेट मधुकर महाराज कडलग श्री श्री रविशंकर विदया मंदिर शाळा अध्यक्ष संदिप कसार निवड समिती अध्यक्ष चंद्रकांत झुंरगे .श्रीरामपुर तालुका अध्यक्ष राजेन्द्र देसाई . शहर अध्यक्ष अमोल कदम श्री फुलसौदर सचिव गौरव शेटे . पद्मनाथ वाघमारे आदि पत्रकार प्रयत्नशील होते सदरचा उपक्रम राज्यभर राबविणार असल्याचे डॉ आरोटे यांनी व्यक्त केले कार्यक्रमाचे आयोजन राजेंद्र देसाई यांनी केले तर अध्यक्ष संदिप कसार यांनी आभार मानले

# जुहू येथील सन एन सँड हॉटेलमध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेट चॅम्पियनशिपचा उद्घाटन

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

मुंबई : आंतरराष्ट्रीय क्रिकेट चॅम्पियनशिपचा( टेनिस बॉल) भव्य शुभारंभ जुहू येथील सन एन सँड हॉटेलमध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेट चॅम्पियनशिपचा उद्घाटन सोहळा पार पडरराष्ट्रीय क्रिकेट चॅम्पियनशिपचा उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी अनेक मान्यवर व पत्रकार प्रतिनिधी उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून राष्ट्रीय मार्गदर्शक सोनल प्रल्हाद मोदी जी( मा पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांची पुतणी) होत्या. प्रमुख पाहुणे डॉ. गोरक्ष धोत्रे जी राष्ट्रीय अध्यक्ष- ऑल इंडिया मीडिया वर्कर्स असोसिएशन आणि एम .डी इंटरनॅशनलच्या संस्थापक, बॉलीवूडच्या सर्वात तरुण चित्रपट निर्मात्या मनीषा राणावत होते.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट चॅम्पियनशिप स्पर्धेत ८ देश सहभागी होणार आहेत. चॅम्पियनशिप जानेवारी २०२५ मध्ये मुंबईत होणार आहे. समारंभात भारतीय क्रिकेट बॅशचा शुभारंभही करण्यात आला. ही लीग आयपीएलच्या फॉरमॅटवर आयोजित केली जाईल. प्रख्यात ब्रँड भारतातील प्रमुख शहरांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पुरुष आणि महिला संघांचे मालक असेल. भारतीय क्रिकेट बॅशमधील सर्वोत्तम ३० खेळाडूंची राष्ट्रीय शिबिरासाठी निवड केली जाईल. या शिबिरातून १५ खेळाडू निवडले जातील जे आंतरराष्ट्रीय क्रिकेट चॅम्पियनशिपमध्ये टीम इंडियाचे प्रतिनिधित्व करतील. संरक्षक चंद्रू वाधवा, अध्यक्ष नीरज धीर, सरचिटणीस पियाली सिंगरॉय, सल्लागार चिरायुष पटेल, कार्यकारिणी सदस्य अजय भसीन, कार्यकारिणी सदस्य सुरेश वावेकर, कार्यकारिणी सदस्य मनोज जगताप, सल्लागार अभिजीत, समन्वयक अंशुल छाजड आणि सहयोगी हरिकेश जैस्वाल यांचा समावेश आहे.या कार्यक्रमात 'मैं वही हूं' या अनोख्या संकल्पनेचा टीझर लाँच करण्यात आला ज्यामध्ये भगवान श्री कृष्ण त्यांची कथा कथन करताना दाखवण्यात आले आहेत.




ग्लोबस इव्हेंट्सचे अध्यक्ष सचिन शेळके, ग्लोबस इव्हेंट्सचे सह-संस्थापक सोनल बच्छाव, लेखक विवेक आपटे, दिग्दर्शक रघुवीर कुलकर्णी, निर्माता प्रशांत फुलवणे व समीर पोतदार यांनी ही संकल्पना आखली आहे. हे संगीत नाटक म्हणून भारतात आणि जगभरात सादर केले जाईल. फिटनेस उद्योजक गजेंद्र राजपुरोहित, उद्योजक निलेश निकम, संतन, लेखक दिग्दर्शक साहिल अशा अनेक उद्योजक, खेळाडू यांनीही या कार्यक्रमाला उपस्थिती लावली.

# इंदापूर मध्ये बँक व्यवस्थापकाला मारहाण;पाच जणांवरती गुन्हा दाखल






**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

इंदापुर/अतुल सोनकांबळे :इंदापूर तालुक्यातील लोणी देवकर येथील बँक ऑफ बडोदा या बँकेच्या व्यवस्थापकाला लोणी येथे पाच लोकांनी अडवून मारहाण केल्याची घटना घडली आहे. सदर व्यक्तींच्या विरोधात इंदापूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.३० रोजी लोणी देवकर येथे बँक ऑफ बडोदा या शाखेचे काम आटोपल्या बँक व्यवस्थापक मनोज बाळासाहेब भोसले , रा . फिनिक्स अपार्टमेंट पळसदेव हे गणेश किसन कडाकणे व महेश कुमार अय्यर यांच्यासोबत नेहमीप्रमाणे वेगवेगळ्या मोटरसायकल वरून घरी जात असताना पूर्वीचा वाद मनामध्ये ठेवून सागर थोरात या व्यक्तीने साथीदारांसह पाठीमागून येऊन मारहाण केल्याची घटना घडली आहे. सदर बँक व्यवस्थापक मनोज भोसले व त्यांचे सहकारी घाबरून पाठीमागे वळाले असताना त्यांना लोणी देवकर येथील शिवाजी चौकात आल्यानंतर सागर थोरात, निखिल थोरात, सुरज थोरात, शुभम थोरात, महेश थोरात यांनी मोटार सायकल वरून खाली उतरवून लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तसेच गणेश कडाकणे यांना सागर थोरात व इतर साथीदारांनी लाकडी काठीने पायावर व पाठीत मारहाण करत डोक्यामध्ये लोखंडी रॉडने मारहाण केल्याचे फिर्यादी मध्ये नमूद केले आहे. तसेच गणेश कडाकणे यांना मारतो व जाळतो अशी धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

# अमली पदार्थ विरोधी व्यसनमुक्ती जनजागृती अभियान

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

उल्हासनगर/प्रतिनिधी : समाज परिवर्तन युवा संस्था आणि नवा संकल्प सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यामानाने व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रम आणि युवा संवाद कार्यक्रम आज दिनांक ०१ सप्टेंबर २०२४रोजी संपन्न झाले. उल्हासनगर ०२ खेमानी एस. सी.एस स्कूल या ठिकाणी आयोजित करण्यात आले या कार्यक्रमाला ६० पेक्षा जास्ती युवकांनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती म्हणून उल्हासनगर ०१ नं पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विष्णू ताम्हाणे सर आणि त्यांची संपूर्ण पोलिस अधिकारी उपस्थित होते तसेच व्यसन व व्यसनमुक्ती युवा या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी दिशा सामजिक संस्थेचे संस्थागत प्रतिनिधी उपस्थित होते यामध्ये युवकांना मार्गदर्शन करत असताना गुन्हेगारी आणि व्यसन याच्याबद्दल त्यांनी मत व्यक्त केले दिशा सामाजिक संस्थेकडून व्यसनमुक्त झालेल्या युवकांचा संवाद उपस्थित युवा वर्गशी करुन दिला.आणि काही वैयक्तिक अनुभव त्यांनी युवकांना सोबत मांडले. आजच्या कार्यक्रमाला, नव सामाजिक संस्थेचे महासचिव मा.अशोक भाऊ निकम उपस्थित होते त्याचबरोबर समाज परिवर्तन युवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयेश जाधव वरिष्ठ सल्लागार दिनेश गोडांबे खजिनदार अनमोल भोईर वंचित बहुजन आघाडीचे उल्हासनगर उपजिल्हाप्रमुख बाळासाहेब अहिरे, भरत रणदिवे, साजिद शेख उपस्थित होते कार्यक्रमाची सांगता दिनेश गोडांबे यांनी केली. सर्वांच्या सहकार्याने हा व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रम तसेच युवा संवाद कार्यक्रम यशस्वीरित्या युवकांसोबत पार पडले




# स्वेरीच्या चार विद्यार्थ्यांची 'किर्लोस्कर चिलर्स' या नामांकित कंपनीत निवड

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'किर्लोस्कर चिलर्स' या नामांकित कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग या विभागातील चार विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राईव्ह मधून निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली. 'किर्लोस्कर चिलर्स' या नामांकित कंपनीच्या निवड समितीने निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून स्वेरीच्या प्रियांका शंकर देवमारे, मानसी नितीन चव्हाण, शुभम ज्ञानेश्र्वर तोडकरी व सुधीर राजकुमार राऊत या चार विद्यार्थ्यांची निवड केली. 'किर्लोस्कर चिलर्स' ही कंपनी २० वर्षापेक्षा अधिक जुनी आहे. ही कंपनी प्रामुख्याने एचव्हीएसी अँड आर या क्षेत्रात कार्यरत आहे. किर्लोस्कर या नामांकित ग्रुप मधील ही एक कंपनी आहे. स्वेरीचे माजी विद्यार्थी देखील या कंपनीत कार्यरत आहेत. अशा नामवंत कंपनीत स्वेरीचे विद्यार्थी रुजू होतात, हे देखील विशेष महत्वाचे आहे. स्वेरी अभियांत्रिकीमध्ये विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या प्लेसमेंटसाठी येत असतात आणि कंपनीसाठी पात्र अशा विद्यार्थ्यांची निवड करत असतात. त्यामुळे विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये येथील विद्यार्थी आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. या विद्यार्थ्यांना स्वेरीमध्ये विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट मधील व विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, अभियांत्रिकी पदवीच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी कॅम्पस इंटरव्युवमधून 'किर्लोस्कर चिलर्स' या कंपनीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# सैनिक टाकळी गावचे सुपुत्र सुधीर पाटील यांची एस.पी.जी. कमांडो पदी निवड

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**



टाकळीवाडी/ प्रतिनिधीः सैनिक टाकळी तालुका शिरोळ येथील विशेष सुरक्षा विभाग पुणे येथे कार्यरत असलेले सुधीर पाटील यांची दिल्ली येथे SPG Commando साठी निवड झाल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. यांची निवड झाल्याबद्दल प्रथमेश ऊर्फ राज काटकर व पत्रकार नामदेव निर्मळे यांनी त्यांना शुभेच्छा देऊन गौरव करण्यात आला.

# आझाद क्रांती सेने तर्फे ईटकुर येथे आज्जीचा खाऊ या नवीन उपक्रमाची सुरुवात

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

कळंब/सुधाकर रणदिवे, कळंब तालुक्यातील ईटकुर येथे आझाद क्रांती सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष धनंजय भाऊ मोरे यांच्यातर्फे






एक आगळावेगळा उपक्रम चालू केला आहे. या उपक्रमाचे उद्घाटन कळंब पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रवी सानप साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.

या उपक्रमाचा उद्देश आजी आजोबांच्या उपकारांची जाण ठेऊन एका नातवाकडून एक नवीन उपक्रम राबविण्यात येत आहे. आज समाजामध्ये एक टाईम जेवणाला सुद्धा काही लोक मुश्किल आहेत अशा लोकांसाठी हा उपक्रम राबविण्यात आलेला आहे. खरोखरच यांचे करावे एवढे कौतुक कमीच आहे. चांगल्या कामाची स्तुती केली पाहिजे अशा शब्दांमध्ये सानप साहेबांनी त्यांची स्तुती केली. समाजामध्ये चांगली कामे करणारी लोक फार कमी असतात. त्यामुळे अशी कामे करणाऱ्या लोकांना फार त्रास होतो. हा कार्यक्रम आझाद क्रांती सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष धनंजय भाऊ मोरे,संघटन प्रमुख श्रेयस मोरे,राष्ट्रीय सचिव ऋतिक शिंदे, प्रसिद्धीप्रमुख कृष्णा मोरे, यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम करण्यात आला आहे, या कार्यक्रमासाठी उपस्थित म्हणून शिवाजी कसबे, शाहू मोरे, बापू मोरे भाग्यवंत मोरे, सचिन शिंदे, श्रीकांत चव्हाण, विनोद मोरे, यश चव्हाण, शिंदे सुखदेव, भाऊराव मोरे, कैलास मोरे, संतराम शिंदे, सागर शिंदे, विश्र्वनाथ मोरे, द्वारकाबाई मोरे, पत्रकार एल डी शिंदे, पत्रकार सुधाकर रणदिवे, मिलिंद रणदिवे,राहुल रणदिवे, छत्रभुज रणदिवे, निलेश शिंदे, व ईतर कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# छत्रपतींना सामूहिक मानवंदना देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : अभिजित जगताप

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पुरंदर : अखंड महाराष्ट्राचे आराध्यदैवत, छत्रपती शिवरायांचा पूर्णाकृती पुतळा कोकणातील मालवण येथील राजकोट मध्ये कोसळला त्या दुःखद घटनेबद्दल सहसंवेदना व्यक्त करुन , छत्रपती शिवाजी महारांजाना सामूहिक मानवंदना देण्यासाठी शिव-शाहीरांसह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, तरी पुरंदर तालुक्यातील शिव प्रेमीं विविध पक्ष, सामाजिक संघटना व पुरंदर वाशियांनी उद्या सोमवार दि. २ /९ / २०२४ रोजी, सकाळी १० वाजता मोठ्या संख्येने सासवड येथील शिवतीर्थावर उपस्थित राहावे ,असे आवाहन , शिवसेना उबाठा गटाचे पुरंदर तालुका प्रमुख अभिजित जगताप यांनी सोशल मिडियावरुन केले आहे. मालवण येथील राजकोट गडावर अखंड महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा आठ महिन्यांपूर्वी उभारलेला अश्र्वारुढ



पुतळा कोसळल्याने या दुःखद घटनेचा संपूर्ण महाराष्ट्रात निषेध व्यक्त केला जात आहे, त्या अनुषंगाने पुरंदर तालुक्यात देखील शिवशाहीरांच्या उपस्थितीत आणि पहाडी आवाजात छत्रपती शिवरायांच्या विचारांचा जागर करून अभिवादन करण्यासाठी आपण एकत्र जमणार आहोत, डलेल्या घटनेचा निषेध आणि तीव्र शोक व्यक्त करत सासवड येथे आत्मक्लेशकरण्याचं आयोजन शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे तसेच विविध श्री शिवप्रेमी संघटना,नागरिक आणि समस्त पुरंदरकरांच्या वतीने शिवतिर्थ परिसर सासवड येथे सोमवार दिनांक २/९ /२०२४ रोजी सकाळी १० ते ४ वाजे पर्यंत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, तरी राष्ट्रीय कर्तव्य म्हणून शिव प्रेमींनी सामाजिक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी व पुरंदर वाशीयांनी छत्रपती शिवाजी महाराजांना सामूहिक मानवंदना देण्यासाठी व अभिवादन करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अभिजित जगताप यांनी केले आहे,

# सागर सोनकांबळे यांना विद्यार्थी सन्मान पुरस्कारासाठी निवड

पुणे/प्रतिनिधी : भीमशक्ती सामाजिक संघटना महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या वतीने देण्यात येणारा विद्यार्थी सन्मान पुरस्कार यंदा अक्कलकोट तालुक्यातील किणी गावचे सुपुत्र * सागर सोनकांबळे* यांना देण्यात येणार आहे.



उत्तम अभ्यासक आणि मार्गदर्शक तसेच विद्यार्थी चळवळीमध्ये सक्रिय योगदान, विद्यार्थी चळवळीच्या माध्यमातून गरीब गरजू विद्यार्थ्यांना विशेषता होतकरू मुलांना नेहमीच मदत, शैक्षणिक क्षेत्रातील विविध फेलोशिपसाठी संघर्ष करून विद्यार्थ्यांना फेलोशिप मिळवून देण्यात मोलाचा वाटा, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात व्याख्यानाद्वारे प्रबोधन, महाराष्ट्र राज्यात खेडोपाड्यात जाऊन भारतीय संविधानाचे प्रचार आणि प्रसार करण्यात त्यांचं मौलिक योगदान राहिला आहे